(8)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

**जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/** ७६८/२०१८-१९ **दिनांकः-** ९/८/१८

**केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५**

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. ०८ मा.अ.
दिनांक २०/८/२०१८

M.A. (Legal) 1804 V.P.

प्रति,
श्री. जंगम प्रदिप दिलीप
जी-10, गणेश भवन, नर्मदानगर,
केबीन रोड, भाईंदर (पूर्व).

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.

संदर्भ - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला साप्र.51 दि.04/04/2018 रोजीचा अर्ज. (जो या कार्यालयास आवक क्र. मा.अ./768/18-19, दि.07/04/2018 अन्वये प्राप्त)

महोदय,

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्राप्त आपल्या संदर्भित अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाचे अभिलेखाची पडताळणी करुन आपल्या संदर्भिय पत्रातील मुद्दा क्र.1 ते 3 च्या अनुषंगाने दि.01 जानेवारी 2015 ते आजपर्यंत दिलेल्या परवानगीची माहिती आपणांस खालील प्रमाणे उपलब्ध करुन देणेत येत आहे.

मौजे भाईंदर, स.क्र. 559/1 (जुना) 207/1 (नविन) या जागेसाठीच्या मंजूर संचिकेतील आपणांस आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती करीता आपण उक्त संचिकेचे कार्यालयीन वेळेत अवलोकन करुन घ्यावे व त्यापैकी आपणांस हव्या असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती खालीलप्रमाणे नमुद शासकीय शुल्काचा भरणा भरुन कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येतील.

| | | छायाप्रती प्रति प्रत | सत्यप्रती प्रति प्रत |
|---|---|---|---|
| मंजुर नकाशा | - | रु.130/- | रू. 500/- |
| बांधकाम परवानगी | - | रु.10/- | रू. 100/- |
| इतर कागदपत्रे | - | रु.2/- (प्रति प्रत) | |

मुद्दा क्र. 04 :- महानगरपालिकेच्या विधी विभागाशी संबंधित असून सदर प्रकरणी संबंधित विभागाशी संपर्क साधून आवश्यक माहिती प्राप्त करुन घ्यावी, हि विनंती.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये आपणास प्रथम अपील हे श्री. हे.रा. ठाकूर, प्रथम अपीलीय अधिकारी तथा नगररचनाकार, नगररचना विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत दाखल करता येईल.

आपला,

**(केशव शिंदे)**
**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक नगररचनाकार**
**नगररचना विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत पुढील कार्यवाहीस्तव -
मा. जन माहिती अधिकारी
विधी विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका
यांनी संदर्भिय पत्रातील मुद्दा क्र4 च्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित माहिती अर्जदारास विहित मुदतीत देण्यात यावी. (सोबत संदर्भिय पत्राची छायाप्रत.)

27 MAR 2018

जोडपत्र – "अ"
(नियम ३ पहा)

## केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

प्रति,

नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकारी

१. अर्जदाराचे पूर्ण नाव : जंगम प्रदिप दिलीप

२. अर्जदाराचा पूर्ण पत्ता : डी १०. गणेश भवन. नर्मदा नगर केबीन रोड भाईंदर पुर्व. 9869851666.

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

(एक) माहितीचा विषय : मौजे भाईंदर स.क्र 559 - हि.क्र - 1 या भुखंडावरिल इमारतीबाबत.

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी : 1 जानेवारि 2015 ते आजपर्यंत

(तीन) आवश्यक असलेल्या महितीचे वर्णन : 1) नमुद भुखंडावरिल इमारतीसाठी मनपा / नर / 541 / 2016-17. दिनांक 9-05-16 अन्वये बांधकाम परवानगी दिली असुन सदर इमारतीवर वाढिव बांधकाम करण्यांत आलेबाबत अभियंत्याचा तपासणी - पोकशी अहवाल सत्यप्रत करुन द्यावा. 2) सदर वाढिव बांधकामाचे स्वरुप व एकुण क्षेत्रफळ नमुद करुन द्यावे.
3) सदर बांधकामाबाबत जबाबदारि निश्चित करण्यात आलेल्या अधिकारिचे नाव व पदनाम देण्यात यावे 4) न्यायालयीन दावा दाखल झाला असल्यास त्यास जबाबदार अधिकारि निश्चित करुन
देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या सांक्षाकिंत व सत्यप्रती सही शिक्यानिशी दयाव्यात. दयावात व
शासकिय नियमानुसार होणारी फी मी देण्यास तयार आहे. स्टे कॉपी दयावीत

ठिकाण : भाईंदर
दिनांक : 3 / 4 /२०१८

अर्जदाराची सही / अंगठा

(श्री/श्रीमती प्रदिप दिलीप जंगम)

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०८/२०१८-१९
दि. २६/४/२०१८

प्रति,
श्री. प्रदिप दिलिप जंगम
जी-१०, गणेश भवन, नर्मदा नगर,
भाईंदर पुर्व

**विषय :-** केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.

**संदर्भ :-** १) आपला दि. ३/४/२०१८ रोजीचा अर्ज.
२) नगररचना विभागाचे पत्र दि. १८/४/२०१८ (प्राप्त दि. २०/४/२०१८)

महोदय,

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण मौजे भाईंदर, सं. क्र. ५५९ हि. क्र. १ या भुखंडावरील इमारतीबाबत माहिती अपेक्षिली आहे. सदर अर्जातील मुद्दा क्र. ४ विधी विभागाशी संबंधित असल्याने नगररचना विभागाने सदरचा अर्ज दि. १८/४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये विधी विभागास वर्ग केला आहे. तरी मुद्दा क्र. ४ अन्वये आपण उक्त जागेबाबत मा. न्यायालयात दाखल दाव्यामध्ये मा. न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाची प्रत अपेक्षिली आहे. सदरची प्रत विधी विभागाकडे उपलब्ध नसून वादी यांचे वकिल यांनी मा. न्यायालयाने दावा क्र. आर. सी. एस. ७७४/२०१७ मध्ये पारीत केलेले आदेश दि. २२/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहेत. सदर पत्राची प्रत आपणास उपलब्ध करुन देत आहे.

सदरच्या एकूण ०४ प्रतींकरीता प्रत्येकी रु. २/- प्रमाणे रु. ०८/- चा विधी विभागाकडे भरणा करुन सदरच्या प्रती उपलब्ध करुन घेता येतील.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास मा. प्रथम अपिलीय अधिकारी, मा. उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Scenadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

३/५/१८